MHLA050001562022

**विशेष दावा क्र.४५/२०२२ मधील नि.क्र.३७ वरील आदेश**
**( माधवराव .. वि. .. साहेबबी )**

सदरकामी वादीने अर्ज देऊन नमुद केले की, प्रकरण तुर्तातुर्त ताकिद अर्जाच्या चौकशीस प्रलंबित असुन प्रतिवादी क्र.५ हा दिनांक ०६/०३/२०२४ रोजी मयत झाला. त्याचे वारस पुर्वीच पटलावर आहेत.त्यामुळे प्रतिवादी क्र.५ चे नाव दाव्यातून आणि ताकिद अर्जातुन वगळावे.

**२.** प्रतिवादी क्र.१ ते ६ तर्फे म्हणणे देण्यात येऊन मयत प्रतिवादी क्र.५ याला दाव्यात नमुद व्यक्तीशिवाय आणखीन ७ मुली आहेत. त्या सामील पक्षकार करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज रद्द करावा अशी विनंती करण्यात आली आहे.

**३.** याकामी युक्तिवाद ऐकला.

४. वादींचा दावा हा कारक ताकिदीचा असुन प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादीच्या मालकीच्या दावा मिळकतीमध्ये उभारलेले पत्र्याचे शेड काढुन टाकावे आणि कोणतेही बांधकाम करु नये तसेच दावा मिळकतीचा मालक वादी आहे असे घोषीत होऊन मिळण्यासाठी अनुक्रमे कारक ताकिद, निरंतर ताकिद आणि हक्क ज्ञापनाचा दाखल केलेला आहे. यात नमुद दावा घडण्याचे कारण हे फक्त प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्याविरुध्द आहे. प्रतिवादी क्र.५ यास अन्य ७ मुली असल्यास त्यांच्या विरुध्द जर दाव्याला कारण घडले नसेल तर त्यांना सामील पक्षकार करण्याचे कारण नाही. दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ हिच्या मालकीची होती ती तिने वादीस विकली. मुस्लीम कायद्याअंतर्गत एकत्र कुटूंब ही संकल्पना नसल्याने सहहयाद असु शकत नाही त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने विकलेली मिळकत ही तिची एकटीची असल्याने विकली. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी या विकलेल्या मिळकतीवर प्रतिवादी क्र.१ च्या सहाय्याने अनधिकृत बांधकामे उभारली असल्याची वादींचे कथन आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.५ मयत असला तरी त्याच्या बाकीच्या वारसांविरुध्द वादींना तक्रार नसल्याने प्रतिवादी क्र.५ चे नाव दाव्यातून कमी करण्यात येते. त्याच बरोबरीने त्याच्या अन्य वारसांची कोणतीही गरज दावा निर्णीत करण्यासाठी नसल्याने त्यांना सामील पक्षकार करण्याची गरज नाही. सबब, आदेश -

**आदेश**

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.
**२.** वादीने नेमल्या तारखेस दुरुस्त दावा प्रत सादर करावी.

**स्वाक्षरीत/-**

**दिनांक:०६/०१/२०२५.** **[ एस.एन.सरडे ]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.